"Education Through Self-help is our Motto- Karmveer"

The AAC TIMES

Issue-II, October, 2025 to March 2026

Rayat Shikshan Sanshta's, Annasaheb Awate Arts, Commerce & Hutatma Babu Genu Science College & Sau. Kusumben Kantilal Shah Arts, Commerce, Science Jr. College, Manchar, Tal. Ambegaon, Dit. Pune (Maharashta) 410503 INDIA.

Vision :

1. To encourage and stimulate young minds to expand our reach and strengthen ties with all the stakeholders through writing and upgrading their knowledge
2. To create future scientific writers

Mission :

To translate vision into actions by -

1. To mentor students to write reports
2. To expose students to current affairs in the respective fields
3. To reach students for ongoing activities in college
4. To outreach an extended audience about activities in college and create attraction
5. To create forums for interactive sessions

महाराष्ट्राच्या विकासासाठी सतत कार्यरत राहणाऱ्या नेतृत्वाला सलाम !

दादा, तुम्ही कायम स्मरणात राहाल !

- महाराष्ट्र राज्याचे कार्यक्षम उपमुख्यमंत्री
- रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य
- ग्रामीण व सर्वसामान्य विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी पाठबळ.
- पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष
- महाविद्यालये व शाळांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सहकार्य.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांना प्रोत्साहन.
- संस्थेचा विस्तार, प्रगतीसाठी प्रशासनिक व धोरणात्मक मदत.

महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक व सामाजिक विकासासाठी सदैव लढणाऱ्या नेत्यास विनम्र अभिवादन !



Principal's Desk



Dear Readers,

Education is not only about academic learning but also about nurturing creativity, values, and leadership among students. A college magazine plays a vital role in this process by providing a platform for young minds to express their ideas, experiences, and talents.I am pleased to see the publication of AAC Times, which reflects the enthusiasm and dedication of our students and staff. The magazine captures the various academic, cultural, and co-curricular activities conducted in our college and highlights the achievements of our vibrant academic community.I congratulate the editorial team and all the contributors for their sincere efforts in bringing out this publication. I am confident that such initiatives will encourage students to develop confidence, creativity, and a sense of responsibility.My best wishes to the entire team of AAC Times for continued success.

Dr. N. S. Gaikwad, Principal

From Editors Desk

It is a great pleasure to present this issue of AAC Times, highlighting the academic, cultural, and social activities of our college. This magazine reflects the creativity, achievements, and vibrant spirit of our students and staff.We sincerely thank all the contributors, the editorial team, and the college administration for their valuable support in making this publication possible.We hope AAC Times will inform, inspire, and encourage everyone to actively participate in the life of our institution.Happy Reading!

Dr. T. E. Dhone
Editor-in-Chief

Mr. S. S. Walunj
Editor-in-Chief

मा. ना. दिलीपरावजी वळसे पा. यांचे अध्यक्षतेखाली वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



महाविद्यालात १४ मार्च, २०२६ रोजी वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्याचे मा. सहकार मंत्री ना. दिलीपराव वळसे पाटील हे उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे माजी सह-सचिव व प्राचार्य डॉ. डी. डी. पाटील, माजी ऑडिटर प्राचार्य डॉ. अरुण आंधळे हे उपस्थित राहणार आहेत.

या प्रसंगी महाविद्यालयातील विविध क्षेत्रांमध्ये विशेष प्राविण्य व उज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यींना पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच संस्थेमध्ये काम करणाऱ्या गुणवंत सेवकांचाही या वेळी सत्कार करण्यात येणार आहे.

एस.एम.जोशी महाविद्यालयात AI प्रशिक्षण



रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी साहेब यांच्या संकल्पनेतून सुरु झालेल्या AI कोर्स अंतर्गत एस.एम.जोशी महाविद्यालय हडपसर येथे AI ट्रेनर यांना प्रशिक्षण देण्यात आहे. सदर कार्यक्रमामध्ये AI कीटचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये Arduino, Raspberry, ESP32 and Robokit इत्यादी कीटचा समावेश आहे. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक AI ट्रेनर म्हणून उपस्थित होते.



चंद्रकांत दळवी (IAS Retd.)
चेअरमन, रयत शिक्षण संस्था सातारा

नुतन अभ्यासिकेचे बांधकाम प्रगतीपथावर

मंचर नगरपंचायत व मा. ना. दिलीपरावजी वळसे पाटील यांचे विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या निधीतून महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी नविन अभ्यासिकेचे बांधकाम सुरु आहे. हे बांधकाम लवकरच पूर्ण करुन ही अभ्यासिका विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उपलब्ध करुन दिली जाईल अशी माहिती प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी दिली.



अण्णासाहेब आवटे कनिष्ठ महाविद्यालयास A+ श्रेणी प्राप्त



शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखडा या महत्त्वपूर्ण मूल्यांकन प्रक्रियेत मंचर ता. आंबेगाव येथील अण्णासाहेब आवटे कनिष्ठ महाविद्यालयास **A+** श्रेणी प्राप्त झाली. राज्यातील १०,४६४ संस्थांच्या बाह्य मूल्यांकनातून केवळ ४२१ संस्थांना हा सर्वोच्च दर्जा मिळाला असून, त्यामध्ये संस्थेच्या पश्चिम विभागातून शैक्षणिक गुणवत्तेत अग्रेसर असलेल्या मंचर येथील अण्णासाहेब आवटे कनिष्ठ महाविद्यालयाचा समावेश आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राज्यातील १,०२,६५७ शाळांनी स्वयंमूल्यांकन केले होते. त्यातील बाह्य मूल्यांकनासाठी निवड झालेल्या १०,९७२ शाळांपैकी केवळ ४२१ शाळा 'A+' श्रेणीसाठी पात्र ठरल्या. आवटे कनिष्ठ महाविद्यालयाने यात बाजी मारली.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक कार्याची प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड यांनी दखल घेत महाविद्यालयातील शिक्षकांचे अभिनंदन केले.यावेळी जुनिअर कॉलेज चा संपूर्ण स्टाफ उपस्थित होता.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विविध विभागातील प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहकार्य केले. महिला सशक्तीकरणाचा संदेश देत हा कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

Workshop on Compassionate Communication



Dr. Megha Deuskar guiding and supervising the role play of the participants

विद्यार्थ्यांनी दिली २००० वर्षांपूर्वीच्या सातवाहन काळातील नाणेघाट व्यापारी मार्गास भेट.



अण्णासाहेब आवटे कॉलेज मंचर येथील वाणिज्य विभाग व भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने एफ.वाय.बी. कॉम वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पर्यटन भूगोल विषया अंतर्गत एकदिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीचे नियोजन भूगोल विभाग प्रमुख प्राध्यापक विकास मिंढे व वाणिज्य विभाग समन्वयक प्राध्यापक सखाराम उघडे यांनी केले होते. पर्यटन भूगोलातील सांस्कृतिक, सामाजिक व प्राकृतिक घटकांचा मानवी जीवनाशी असणारा परस्पर संबंध माहिती करून घेणे हा या शैक्षणिक सहली मागील हेतू होता. या शैक्षणिक सहलीमध्ये १०४ विद्यार्थी व ११ प्राध्यापक सहभागी झाले होते.विद्यार्थ्यांनी ओझर येथील विघ्नहर व लेण्याद्री येथील गिरिजात्मक गणपतीचे प्रसन्न वातावरणामध्ये दर्शन घेतल्यानंतर नाणेघाटा कडे प्रवासाला सुरुवात झाली दुपारी नाणेघाट या ठिकाणी पोहोचल्यानंतर तेथे असणारे मार्गदर्शक डामसे एस. व्ही. यांनी नाणेघाटाबद्दल ऐतिहासिक माहिती व तेथील गुफा मध्ये असणाऱ्या कोरीव ब्राह्मी लिपी विषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर सहलीच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली.त्यानंतर सहली तील शेवटचे ठिकाण जुन्नर येथील शिवनेरी किल्ल्याला विद्यार्थ्यांनी भेट देवून ऐतिहासिक माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांना सहलीतील भौगोलिक ठिकाणां विषयी सविस्तर माहिती प्रा. अविनाश बर्डे व प्रा.माधुरी काठे यांनी दिली .सहल यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी प्रा. सचिन पारधी,प्रा. मयूर ठोंबरे , प्रा. आकाश पारधी प्रा. विजया खालकर,प्रा. मोहिनी भालेकर, प्रा.अर्चना केंगले व प्रा. संध्या शेटे यांनी परिश्रम घेतले.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थिनी ममता देवरे प्रथम



अण्णासाहेब आवटे कला, वाणिज्य व हुतात्मा बाबू गेनू विज्ञान महाविद्यालय, मंचर येथील विद्यार्थिनी ममता देवरे हिने गुरुवर्य रा. प. सबनीस राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, नारायणगाव येथे प्रथम क्रमांक पटकावत १०,००० रुपयांचे पारितोषिक मिळिवले.या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी ममता देवरे हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आकांक्षा नरवडेचे यश



अण्णासाहेब आवटे कला, वाणिज्य व हुतात्मा बाबू गेनू विज्ञान महाविद्यालय, मंचर येथील विद्यार्थिनी आकांक्षा नरवडे हिने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

सातारा येथे आयोजित कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत तिला उत्तेजनार्थ पारितोषिक व ३००० रुपये देऊन गौरविण्यात आले. तसेच के. बी. रोहमारे स्मृती करंडक राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, कोपरगाव येथे तिने तृतीय क्रमांक पटकावत ३००० रुपयांचे पारितोषिक मिळिवले. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी आकांक्षा नरवडे हिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शिवनेरीवर राबवली स्वच्छता मोहीम



आवटे महाविद्यालय, मंचर येथील इतिहास विभाग व राज्यशास्त्र विभाग अंतर्गत हेरिटेज क्लबच्या सदस्यांनी किल्ले शिवनेरी येथे स्वच्छता मोहीम राबवून ऐतिहासिक वारशाप्रती आपली बांधिलकी जपली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी जागृती निर्माण झाली. तसेच पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

या मोहिमेचे नियोजन इतिहास विभाग प्रमुख प्रा. रविंद्र पारधी यांनी केले. विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या परिसरात स्वच्छता करताना रस्त्याच्या कडेला पडलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या व इतर कचरा गोळा केला. जमा केलेला कचरा किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या कचराकुंडीत टाकून परिसर स्वच्छ करण्यात आला. ऐतिहासिक स्थळांचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

स्वच्छता मोहिमेदरम्यान प्रा. राहुल सरोदे यांनी विद्यार्थ्यांना शिवकालीन इतिहास, तत्कालीन स्थापत्यकला आणि किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रा. सचिन पारधी यांनी शिवकालीन राजनिती, प्रशासकीय यंत्रणा आणि गुप्तहेर व्यवस्थेबाबत मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना त्या काळातील राज्यकारभाराची वैशिष्ट्ये समजावून सांगितली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना इतिहासाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

"Political Science Department Students Visit Milk Chilling Center for Educational Exposure."



The Department of Political Science of College, organized a Field Study Visit to the Awasari Milk Chilling Center on 20 February 2026 to provide students with practical exposure to the functioning of the dairy sector.During the visit, Mr. Vikrant Pansare, an employee of the center, explained the complete working process of the unit, including milk collection, testing, storage, chilling procedures, and overall management of the dairy operations. Students actively observed the processes and interacted with the staff to gain a better understanding of how dairy units operate and contribute to employment generation and rural economic development. The visit was conducted under the guidance of Dr. B. S. Tonde (Head of the Department) and Prof. Sachin Pardhi, who highlighted the importance of field-based learning in connecting academic knowledge with real-world practices. The activity was organized with the permission and support of the Principal, Dr. N. S. Gaikwad.

The field visit proved to be informative and beneficial, helping students enhance their practical understanding of the management and functioning of dairy-based industries and their role in rural development.

महाविद्यालय विकास समितीवर नविन सदस्यांची नियुक्ती



महाविद्यालय विकास समिती (**CDC**) वर उपप्राचार्य प्रा. सुनिल सालके, डॉ. शिल्पा शितोळे व डॉ. सुनिल पानसरे यांची नियुक्ती झाली याबद्दल त्यांचे महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. एन.एस.गायकवाड यांनी हार्दिक अभिनंदन केले.

Department of English Study Tour 2025–26



The Department of English organized a three-day study tour from 16th to 18th February 2026 for its students. A total of 39 students including B.Voc FPQM students, participated in the tour along with three faculty members: Dr. Ganesh Wagh, Head of the Department of English; Mr. Sanatkumar Walunj; and Ms. Mayuri Indore, Head of B.Voc FPQM. The tour was successfully planned and organized under their guidance.

महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी स्थानिक चौकशी समितीची भेट



महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम सुरू करण्याच्या अनुषंगाने विद्यापीठ नियुक्त स्थानिक चौकशी समितीने मंगळवार दि. १० मार्च रोजी महाविद्यालयास भेट दिली. समितीचे चेअरमन डॉ. सरताळे श्रीकृष्ण तसेच सदस्य म्हणून डॉ. मुळे प्रशांत, डॉ. पालवे मधुकर आणि डॉ. गायकवाड संजय उपस्थित होते.

समितीने महाविद्यालयातील उपलब्ध शैक्षणिक सुविधा, पायाभूत सुविधा व आवश्यक बाबींची पाहणी केली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गायकवाड साहेब व उपप्राचार्य डॉ. शाम मिसाळ उपस्थित होते. त्यांनी समिती सदस्यांचे स्वागत करून महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रम व नव्या अभ्यासक्रमांविषयी माहिती दिली.या भेटीदरम्यान समितीने महाविद्यालयातील विविध विभागांची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या.

रयत स्पर्धा परीक्षा अॅकडमीचे उद्घाटन संपन्न



ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेत टिकून रहाता यावे व त्यांना योग्य दिशा मिळावी यासाठी महाविद्यालयामध्ये रयत स्पर्धा परीक्षा अॅकडमीच्या नवीन शाखेचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी शाश्वत अॅकडमी पुणेचे संस्थापक महेश पाटील व उदय कदम यांनी मार्गदर्शन केले. प्रांत अधिकारी गोविंद शिंदे यांचे हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जनरल बॉडी सदस्य बाळासाहेब बाणखेले, प्रा. राजाराम बाणखेले, प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड उपस्थित होते. अॅकडमीचे संचालक डॉ. गणेश वाघ यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

Commerce Trade Fair and Guest Lecture Inspire Student Entrepreneurs



Department of Commerce organized a Commerce Trade Fair and guest lecture to provide practical exposure to students in the fields of trade, entrepreneurship, and marketing.

Mr. Kiran Manikrao Pagar, Director of K.M. Techno Services, Gangapur Road, Nashik, delivered a lecture on the importance of trade fairs in the commerce sector and encouraged students to develop entrepreneurial skills and innovative business ideas. As part of the programme, students set up 61 stalls displaying food items, handmade products, and various small business ideas. The activity helped students gain hands-on experience in marketing, pricing, customer interaction, and teamwork.

Students and staff from the Junior College, Senior College, and M.G. English Medium School also visited the fair and appreciated the efforts of the participants. The event created an enthusiastic learning environment and provided students with an opportunity to apply their theoretical knowledge of commerce in a practical manner.

Guest Lecture on Entrepreneurship Motivates Manchar College Students



Department of Commerce and Student Federation jointly organized a guest lecture on "Milliner Entrepreneurship Mindset" on 28 January 2026.

Mr. Maruti Laxman Mali, Founder of Brahma Udyog Samooha, shared his entrepreneurial journey and emphasized innovation, risk-taking, and perseverance. The interactive session encouraged students to explore self-employment and develop creative business ideas.

The programme was organized by the Department of Commerce & Management with support from the Commerce Association, Entrepreneurship Cell, and IQAC. Principal Dr. N. S. Gaikwad, Dr. V. B. Nikam, and Student Federation President Mr. Kunal Bankhele addressed the students. A total of **377 students** from the Junior and Senior College benefited from the programme, gaining practical knowledge about entrepreneurship. The event concluded with a vote of thanks by Dr. S. S. Ughade.

रसायनशास्त्र विभागप्रमुख

डॉ. आंनदराव काळे सेवानिवृत्त



From Field Visits to Research Awards : Highlights of the Zoology Department



The Department of Zoology at Annasaheb Awate Arts, Commerce and Hutatma Babu Genu Science College, Manchar actively conducted various academic and co-curricular activities during the mid-semester to enhance students' practical knowledge and overall development.

An educational visit to Krushi Vidnyan Kendra, Narayangaon was organized for the students to provide exposure to agricultural practices, animal husbandry techniques, and scientific methods used in rural development. The visit helped students understand the practical applications of biological sciences and sustainable farming practices.

Students of the department achieved remarkable success in research activities. In the International Conference organized by Pimpri College, our students secured 1st and 2nd prizes for their research presentations. In addition, a student also won the 1st prize in a National Conference held at Washi, which brought pride to the department.

On the occasion of National Science Day, the department organized a special event titled “Zoo Fest”. Various activities were conducted under this program, including an Aquarium Exhibition, Blood Checking Camp, Scientific Model Presentation, and Poster Presentation. These activities encouraged students to showcase their scientific creativity and knowledge.

Students also actively participated in Scientific Rangoli, demonstrating innovative ways of presenting scientific concepts through art. Along with academic activities, students were involved in several extracurricular initiatives such as NSS activities, NCC programs, and skill development workshops, which contributed to their personality development and social awareness.

Two National Design Patents and Major Awards for Physicist Sanjay L. Gaikwad



Mr. Sanjay L. Gaikwad, Assistant Professor and Head of the Department of Physics, has made outstanding contributions to research and academic development. During the current academic year, he has been granted two National Design Patents, reflecting his innovation in scientific design and technology. He has also published two research papers in reputed journals. In addition, he has authored seven book chapters, two of which were published by the Royal Society of Chemistry, an internationally recognized scientific publisher.

Along with his academic achievements, Mr. Gaikwad has received several prestigious recognitions, including the Vigyan Setu Award for Popularisation of Science (National Award), the Jivan Gaurav Puraskar by Dalit Panther, and the Dr. B. R. Ambedkar Bharat Samata Puraskar – 2025 for his contribution to science education and society.

SPPU Grants ₹1.5 Lakh ASPIRE Research Funding to Dr. Arun Valvi



Savitribai Phule Pune University has sanctioned a research grant of ₹1,50,000 under the ASPIRE Research Mentorship Scheme to Dr. Arun Karansing Valvi, Assistant Professor at Rayat Shikshan Sanstha's Annasaheb Aawate Arts, Commerce and Hutatma Babu Genu Science College, Manchar. His research project titled “Effect of Greener Solvents on Reactivity & Selectivity of Aromatic Nucleophilic Substitution” has been provisionally selected for funding by the Internal Quality Assurance Cell of Savitribai Phule Pune University under the Science and Technology faculty.

College Hosts SPPU Inter-Collegiate Cross Country Competition

Manchar: Rayat Shikshan Sanstha's Annasaheb Awate Arts, Commerce & Hutatma Babu Genu Science College, Manchar successfully organized the SPPU PDZSC Inter-Collegiate Cross Country Competition (Men & Women) 2025–26 on 17th and 18th November 2025. The event was conducted by the Department of Physical Education and Sports under the Pune District Zonal Sports Committee of Savitribai Phule Pune University.

The cross-country race was conducted on the College – Shindewadi – Eklahare – College route. A total of 94 students from 18 colleges across Pune district participated in the competition, showcasing remarkable endurance and sportsmanship.

The inaugural ceremony was presided over by Principal Dr. N. S. Gaikwad. The event was graced by distinguished guests including international players Harishchandra Thorat, Bharat Bajare, and Shaebrao Mengade, along with Dr. Amay Kale, Secretary of the Pune District Zonal Sports Committee, and Dr. Ramesh Gaikwad, Senate Member.The top six athletes in both boys' and girls' categories were awarded medals, while the top three teams in each category were honored with trophies.The program was introduced and participants were welcomed by Dr. S. P. Pansare, while Gymkhana Committee Coordinator Prof. S. R. Salke proposed the vote of thanks. The successful organization of the event was made possible through the dedicated efforts of Gymkhana Committee members Dr. Tonde, Prof. Minde, Dr. More, Prof. Gholap, Prof. Walunj, and Prof. Khalkar.The competition provided an excellent platform for students to demonstrate their athletic abilities and promote sports culture among college youth.

MATHEXPO-2K25 Organized on National Mathematics Day



The Department of Mathematics organized “MATHEXPO-2K25” on 22 December 2025 to celebrate National Mathematics Day, commemorating the birth anniversary of the great Indian mathematician Srinivasa Ramanujan. The program was presided over by the Principal, Dr. N. S. Gaikwad, who emphasized the significance of mathematics in everyday life and encouraged students to develop logical and analytical thinking. A mathematical drama titled “I Can't Live Without It,” presented by the students of the Mathematics Department, was a special attraction of the event and was highly appreciated by the audience.

The program was coordinated by Ms. Thorat D.G. and Ms. Thorat P.S., while Mr. Shete R.K. conducted the proceedings. Mr. Gaikwad R.S. proposed the vote of thanks. The event successfully honored the legacy of Srinivasa Ramanujan and promoted interest in mathematics among students of Ambegaon Taluka.



महाविद्यालयातील विद्यार्थी परिषदेवर अध्यक्ष म्हणून आशिष वागळे व सचिव म्हणून अहमद अन्सारी यांची निवड





अनुराग गायकवाडची मराठी भाषा ‘युवा दूत’ म्हणून निवड

मराठी भाषा विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या सयुक्त विद्यमाने मराठी भाषा युवा दूत ऑनलाईन मराठी वक्तृत्व स्पर्धा जागतिक स्तरावर आयोजित करण्यात आली होती. १०३९ विद्यार्थ्यांमधून उत्तम १०० विद्यार्थी मराठी भाषा दूत म्हणून निवडले गेले. या १०० दुतांमध्ये महाविद्यालयाचा विद्यार्थी अनुराग गायकवाडची मराठी भाषा युवा दूत म्हणून निवड करण्यात आली. अनुरागला प्रा. डॉ. गार्डी व प्रा. शुभांगी भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. अनुरागचे प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी अभिनंदन केले.

अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न



महाविद्यालयात 'अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा' उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व महाविद्यालय विकास समिती सदस्य मा. श्री. बाळासाहेब बेंडे तसेच अण्णासाहेब आवटे यांचे नातू अजय आवटे (उद्योजक व प्रगतिशील शेतकरी) यांच्या हस्ते झाले.

स्पर्धा माध्यमिक, कनिष्ठ आणि वरिष्ठ अशा तीन गटांमध्ये विविध समकालीन विषयांवर घेण्यात आली. या स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी वकृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे सांगितले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. सुनिल सालके, डॉ. शाम मिसाळ, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रिया इंझळकर, सूत्रसंचालन डॉ. गणेश वाघ व डॉ. तुषार ढोणे, तर आभार प्रदर्शन डॉ. पी. बी. गार्डी यांनी केले.

पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न



महाविद्यालयात मंचर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समिती (**PDZSC**) अंतर्गत आयोजित आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट (मुले) स्पर्धा ३ ते ७ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत महाविद्यालयाच्या क्रिकेट मैदानावर उत्साहात पार पडली. या स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ११ महाविद्यालयांमधील १६२ खेळाडूंनी सहभाग नोंदवला. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके, मुंबई विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक डॉ. मोहन आमरोळे, पुणे जिल्हा विभागीय क्रीडा समितीचे सचिव डॉ. अमय काळे तसेच समिती सदस्य डॉ. रमेश गायकवाड यांनी स्पर्धेला भेट दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. एस. पी. पानसरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन जिमखाना समिती समन्वयक प्रा. एस. आर. सालके यांनी केले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिमखाना समिती सदस्य डॉ. तोंडे, प्रा. मिंडे, डॉ. मोरे, प्रा. घोलप, प्रा. वाळुंज आणि प्रा. खालकर यांनी विशेष परिश्रम घेतले. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना क्रीडाक्षेत्रात आपली कौशल्ये दाखवण्याची उत्तम संधी मिळाली.

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात नव उद्योजकता व व्यवसाय समुपदेशन कार्यशाळा उत्साहात



महाविद्यालयामध्ये, विद्यार्थी विकास मंडळ, कॉमर्स विभाग व अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन कक्ष (खटअउ) यांच्या संयुक्त विद्यमाने २७ फेब्रुवारी २०२६ रोजी वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय नव उद्योजकता तथा व्यवसाय समुपदेशन कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

उद्योजकतेबाबत जागरूकता निर्माण करणे तसेच नवउद्योजकांना यशस्वी व्यवसाय सुरू व व्यवस्थापित करण्यासाठी मार्गदर्शन करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. आर. सालके यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख वक्ते श्री. किरण पगार यांनी Startup India आणि Make in India यांसारख्या शासकीय योजनांची माहिती देत विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

यावेळी व्यवसाय संधींची ओळख, व्यवसाय आराखडा तयार करणे, आर्थिक व्यवस्थापन, बाजार सर्वेक्षण, खर्च नियंत्रण तसेच डिजिटल मार्केटिंग आणि ब्रँडिंग या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. ए. के. वळवी, कॉमर्स विभाग प्रमुख डॉ. व्ही. बी. निकम, खटअउ समन्वयक प्रा. हेमांगी गावित तसेच सर्व समिती सदस्य व प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यशाळेत २३ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व १०० विद्यार्थी सहभागी झाले होते. एकूणच ही कार्यशाळा माहितीपूर्ण व प्रेरणादायी ठरून विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय कौशल्यविकासाला आणि स्वावलंबनाला चालना देणारी ठरली.

डॉ. रेश्मा सचिन पवार यांना रसायनशास्त्र विषयात पीएचडी



कॉलेजच्या संशोधन केंद्रातील संशोधक डॉ. रेश्मा सचिन पवार यांनी रसायनशास्त्र विषयात पीएचडी पदवी संपादन केली आहे. त्यांनी आपले संशोधन पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे सादर केले. डॉ. पवार यांनी "Characterization of Eco-friendly Adsorptive Materials and Study of Adsorption of Organic Acids, Phenols and Heavy Metals" या विषयावर संशोधन केले. हे संशोधन अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स अँड हुतात्मा बाबू गेणू सायन्स कॉलेज, मंचर येथे पूर्ण करण्यात आले. त्यांच्या संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. आनंदराव ए. काळे यांनी मार्गदर्शन केले, तर सह-मार्गदर्शक म्हणून प्रा. किसन. एम. गाडवे यांनी सहकार्य केले. डॉ. रेश्मा पवार यांची पीएचडी मौखिक परीक्षा ४ मार्च २०२६ रोजी दुपारी २ वाजता पार पडली. यासाठी बाह्य परीक्षक म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील रसायनशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. गोविंद बी. कोळेकर उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सुभाष पिंगळे होते. अण्णासाहेब आवटे कॉलेजच्या रसायनशास्त्र विभाग संशोधन केंद्रातून पीएचडी पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्या विद्यार्थिनी ठरल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड व प्राध्यापक, सहकारी तसेच कुटुंबीय मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

रसायनशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. रमेश गावडे यांची नियुक्ती



अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. आनंदराव काळे हे दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्यकाळात विभागाच्या शैक्षणिक प्रगतीस मोठे योगदान मिळाले. डॉ. काळे यांच्या सेवानिवृत्तीनंतर विद्यापीठाच्या नियमांनुसार महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुखपदी डॉ. रमेश गावडे यांची नियुक्ती केली.

या प्रसंगी उप प्राचार्य डॉ. श्याम मिसाळ, डॉ. अरुण वळवी, प्रा. भाग्यश्री नायकोडी, प्रा. प्रांजल ठोसर, प्रा. काझी , प्रा. गटे, लॅब असिस्टंट श्री. अरुण बाणखेले तसेच इतर प्राध्यापकांनी डॉ. रमेश गावडे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत स्नेहल ढोबळे अव्वल



महाविद्यालयामध्ये आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत स्नेहल ढोबळे हिने उत्कृष्ट वक्तृत्व सादर करत प्रथम क्रमांक मिळवला. या स्पर्धेत तिला ७,००० रुपयांचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

भिमाशंकर सहकारी साखर कारखान्यास रसायनशास्त्र विभागाची शैक्षणिक भेट



दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल भिमाशंकर सहकारी साखर कारखाना लिमिटेड, दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव, जि. पुणे) येथे आयोजित करण्यात आली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना ऊसापासून साखर तयार होण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहण्याची आणि समजून घेण्याची संधी मिळाली.

कारखान्याचे अधिकारी ढगेसाहेब व हिंगेसाहेब यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून सहलीसाठी आवश्यक ते सहकार्य केले. विद्यार्थ्यांना ऊस कारखान्यात दाखल झाल्यापासून ते साखर निर्मिती होईपर्यंतच्या सर्व टप्प्यांची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच साखरेचे प्रतवारीनुसार वर्गीकरण, गोणीमध्ये पॅकिंग, गोडावनातील साठवण आणि पुढील वितरण प्रक्रिया याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी व कामगारांनी मार्गदर्शन केले.

या शैक्षणिक सहलीचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड व डॉ. आनंदराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. सहलीमध्ये रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. रमेश गावडे, प्रा. भाग्यश्री नायकोडी, प्रा. काझी मिस्बाह तसेच विभागातील ३६ विद्यार्थी सहभागी झाले होते.



मंचर नगर पंचायत, मंचर बस स्थानक, अण्णासाहेब आवटे कॉलेज राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत सामाजिक उपक्रम राबविण्यात आला

जागतिक महिला दिन उत्साहात साजरा



अण्णासाहेब आवटे कॉलेज,मंचर येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महिला सशक्तीकरण आणि समान संधी कक्ष, POSH , अँटी रॅगिंग, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व अंतर्गत गुणवत्ता मूल्यांकन कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या निमित्ताने महिला कर्मचारी आणि विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये केशभूषा (Hairstyle), पारंपरिक वेशभूषा, नेल आर्ट आणि मेहेंदी स्पर्धा यांचा समावेश होता. या स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपली कला आणि कौशल्य सादर केले. तसेच पारंपरिक दिन साजरा करून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विविध विभागातील प्राध्यापकांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहकार्य केले. महिला सशक्तीकरणाचा संदेश देत हा कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

महाविद्यालयात 'निर्भय कन्या अभियान' कार्यशाळा उत्साहात

महाविद्यालयामध्ये विद्यार्थी विकास मंडळ, विद्यार्थिनी मंच, शिस्त समिती, लैंगिक अत्याचार प्रतिबंधक समिती व अंतर्गत गुणवत्ता मूल्यमापन कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने 'निर्भय कन्या अभियान' अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली. विद्यार्थिनींना शारीरिक, मानसिक व भावनिक स्तरावर सक्षम बनविणे तसेच स्वसंरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यशाळेचे आयोजन तीन सत्रांमध्ये करण्यात आले होते. पहिल्या सत्रात नारायणगाव येथील श्री. सुनिल गायकवाड यांनी ज्युदो-कराटेचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले. दुसऱ्या सत्रात उपजिल्हा रुग्णालय, मंचर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रतिभा कहडणे यांनी किशोरवयीन मुलींच्या शारीरिक व मानसिक आरोग्य, संतुलित आहार आणि वैयक्तिक स्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात घोडेगाव न्यायालयाच्या ॲड. प्रतिक्षा काळे यांनी महिलांचे हक्क, कायदे आणि समाज परिवर्तनातील स्त्रीची भूमिका यावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी विद्यार्थिनींनी महत्वाकांक्षा, आत्मविश्वास, सकारात्मकता आणि प्रबळ इच्छाशक्ती यांच्या आधारे जीवनात यश मिळवावे असे सांगितले.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. ए. के. वळवी, शिस्त समितीचे अध्यक्ष डॉ. एस. पी. पानसरे, विद्यार्थिनी मंचच्या अध्यक्षा प्रा. डॉ. सपना पाटील, लैंगिक अत्याचार प्रतिबंधक समितीच्या अध्यक्षा प्रा. डॉ. शिल्पा शितोळे, खटअउ समन्वयक प्रा. हेमांगी गावित तसेच सर्व समिती सदस्य व प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. एस. पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. शिल्पा शितोळे यांनी केले. या कार्यशाळेत २० शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व १५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. विद्यार्थिनींच्या सक्षमीकरणासाठी आयोजित ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त व प्रेरणादायी ठरली.

कुसुमाग्रज जयंतीनिमित्त महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

रयत शिक्षण संस्थेच्या अण्णासाहेब आवटे कला, कॉमर्स व हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर येथे मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मराठी विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या 'उन्मेष' या विशेष भित्तिपत्रकाचे उद्घाटन डॉ. पी. एन. गायकवाड, प्रा. अनिल निघोट, डॉ. गीता शिंदे व प्रा. नितीन बाणखेले यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पी. एन. गायकवाड यांनी समाजातील बदलत्या घडामोडींमध्ये मराठी भाषा तसेच बोलीभाषा जतन करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी प्रा. अनिल निघोट लिखित आठ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त आयोजित विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमास मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. गार्डी बी. पी., प्रा. भवारी सी. बी., प्रा. मुंढे जी. डी., प्रा. झावरे सी. ए., प्रा. केंगले ए. के. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

EDITORIAL COMMITTEE

Editors-in-Chief

Dr. N. S. Gaikwad (Principal)
Ms. H. J. Gavit (Co-ordinator, IQAC)
Dr. B. P. Gardi (Chairman, Cultural Committee)
Dr. T. E. Dhone (Chairman, Arts & Commerce Stream)
Mr. S. S. Walunj (Chairman, Science Stream)

Members

Mr. G. D. Mundhe Dr. R. B. Gawade Dr. G. C. Wagh
Dr. V. B. Nikam Ms. S. D. Khatal Ms. J. B. Khilari
Ms. D. V. Kalokhe

Student Editorial Board

Mr. Pradip Bokad (T.Y. B.A.)
Ms. Sakshi Shewale (T.Y. B.Sc Biotech)
Ms. Manisha Bhange (S.Y. B. A.)
Ms. Purva Borhade (S.Y. B. A.)

Disclaimer : This digital newsletter is for information purpose only. The views and opinions expressed herein are solely those of the author and do not necessarily reflect those of the college. This newsletter is for private circulation only.